# <u>पोलीस कोठडीत आरोपीचा मृत्यू</u>

मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, कलम २१ अन्वये महाराष्ट्रात, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.
मा. पोलीस महासंचालक, मानव अधिकार यांच्या दिनांक ८/१२/२००४ च्या पत्रातील निर्देशांनुसार, पोलीस कोठडीत होणारे मृत्यू आणि पोलीस कोठडीत होणारे बलात्कार यांबाबत, अशा घटनेच्या २४ तासात मानवी हक्क आयोगाला कळविणे आवश्यक आहे.

वरील प्रकारची घटना घडल्यास संबंधीत पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक यांच्यामार्फत किंवा स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत तातडीने जिल्हा दंडाधिकारी, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांना कळवले जाते. तसेच घटना स्थळाचा पंचनामा व इन्क्वेस्ट पंचनामा कार्यकारी दंडाधिकारी यांच्यामार्फत, चित्रीकरणासह केला जातो.

दिनांक २/९/२०११ रोजी सादर झालेल्या पोलीस अहवालानुसार सन २००९ ते २०११ या काळात २३ पेक्षा जास्त मृत्यू पोलीस कोठडीत झालेले आहेत त्यापैकी ५०% मृत्यू नैसर्गिक कारणांमुळे, ३७% मृत्यू संबंधिताने आत्महत्या केल्यामुळे तर ११% मृत्यू पोलिसांनी केल्याला मारहाणीमुळे झालेले आहेत.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे परिपत्रक एचआरसी/०५९७/६५/पोल-१४, मंत्रालय, मुंबई, दिनांक २२/२/२००१ अन्वये पोलीस कोठडीतील मृत्यू झालेल्या व्यक्तीचे शवविच्छेदन खालील अकरापैकी एका रूग्णालयात करावे अशा सूचना आहेत.
१. ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई
२. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे
३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
४. डॉ. वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, सोलापुर
५. कै. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे
६. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद
७. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड
८. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर
९. इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर
१०. स्वामी रामानंद तिर्थ ग्रामिण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, आंबेजोगाई
११. कै. श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ

असे शवविच्छेदन दोन किंवा अधिक डॉक्टरर्सच्या पॅनलने करावे तसेच शवविच्छेदनाचे चित्रीकरण करणारा इसम जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला असावा. शवविच्छेदनाच्या वेळी मयताचे नातेवाईक हजर असावेत. व त्यांना शवविच्छेदन नोट्सची एक प्रत देण्यात यावी. शवविच्छेदन चित्रीकरणाची एक प्रत व संबंधीत सर्व कागदपत्रांची प्रत राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्याला तात्काळ देण्यात यावी आणि एक प्रत तात्काळ मानवी हक्क आयोगालाला पाठविण्याची जबाबदारी संबंधित रूग्णालयाची असेल.

मा. पोलीस उपमहानिरीक्षक, राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली यांनी 'कोठडीतील मृत्यू' याबाबत दिनांक २१/११/२०१६ रोजीच्या पत्राने दिलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारे मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, मुंबई यांनी दिनांक १४/१२/२०१६ च्या परिपत्रकानूसार खालील प्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

• "पोलीस कोठडीतील मृत्यू" म्हणजे, जी व्यक्ती सर्वसाधारणपणे पोलीस अभिकक्षेत (पोलीस कोठडी) किंवा चौकशीकरीता पोलिसांच्या ताब्यात असतांना मरण पावते त्याला 'पोलीस कोठडीतील मृत्यू' असे संबोधण्यात यावे.

• "न्यायालयीन कोठडीतील मृत्यू" म्हणजे, न्यायाधिशांनी मॅजिस्ट्रेट कस्टडी रिमांड दिलेली किंवा कैदी (बंदी) कारागृहात असेलेली व्यक्ती कोणत्याही कारणाने मरण पावली तर त्याला 'न्यायालयीन कोठडीतील मृत्यू' असे संबोधण्यात यावे. यामध्ये कैदी आजारामुळे किंवा पोलीस संरक्षणात वैद्यकीय उपचार घेत असतांना रूग्णालयात मरण पावला असेल किंवा पोलीस संरक्षणात रूग्णालयात नेतांना मयत झाला असेल तरीही त्याला 'न्यायालयीन कोठडीतील मृत्यू' असे संबोधण्यात यावे.

याबाबत राष्ट्रीय मानवी आयोगास स्थानिक पोलिसांमार्फत न कळवता कारागृह प्रशासनामार्फत कळविण्यात यावे. कारण रूग्णालयातील कैदी (बंदी) उपचार घेत असतांना त्याले सुरक्षेच्यादृष्टीने पोलीस पहारा व सुरक्षा देणे ही रूग्णालय प्रशासनाची जबाबदारी आहे.

• जर कैदी (बंदी) हा सशस्त्र पहाऱ्यात किंवा जेल कस्टडीमध्ये असताना व तो वॉरंटमधील असेल व त्यास पोलीस संरक्षणात कोर्टात हजर करायचे असेल तर जेल प्रशासनाने त्याच्या प्रवासाबाबत व ज्या कोर्टात त्यास हजर करावयाचे आहे त्या ठिकाणापर्यंत सुरक्षेबाबत उपाय योजना करणे आवश्यक आहे. त्यावेळी सदरचा कैदी'न्यायालयीन कोठडीतील कैदी' संबोधण्यात यावा. व त्याच्या मृत्युबद्दल राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली यांना कारागृह प्रशासनामार्फत कळविणे आवश्यक आहे.

पोलीस अथवा न्यायालयीन कोठडीत आरोपीचा मृत्यू झाल्यास, त्याच्या मृत्युच्या कारणांची दंडाधिकारीय चौकशी करावी लागते.

◆ पोलीस कोठडीतील मृत्युचे प्रमाण कमी व्हावे म्हणून मा. उच्च न्यायालयाने फौजदारी रिट याचिका क्रमांक २११०/२०१४ आणि २०५७/२०१२ मध्ये खालील निर्देश दिलेले आहेत.

१) माननीय सर्वोच्च न्यायालयाने डी. के बसु प्रकरणातात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तसेच आरोपींना अटक करणे, त्यांना न्यायालयासमोर हजर करणे, पोलीस कोठडी देणे याबाबत फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये २००६ व २००९ मध्ये करण्यात आलेल्या तरतुदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

२) अटक आरोपीची सुरक्षा, आरोग्य व जिविताची जबाबदारी, त्यास अटक करणारा अधिकारी, तपासी अधिकारी, स्टेशन हाऊस ऑफीसर व त्या ठाण्याचा वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांची राहील.

३) अटक केलेल्या व पोलीस कोठडी देण्यात आलेल्या आरोपीस दुखापत झाल्याचे आढळल्यास त्यास तात्काळ जवळच्या रूग्णालयात नेऊन उच्च प्रतीची वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांच्या जिविताचे व स्वास्थाचे रक्षण करावे.

४) आरोपीस अटक केल्यानंतर २४ तासात संबंधित प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी त्यास न्यायालयासमोर हजर करावे तसेच त्याच्या नातेवाईकांना त्याच्या अटकेबाबत व त्याच्या कारणांबाबत अवगत करावे.

५) पोलीस कोठडीतील आरोपीस एखादी दुखापत झाल्याचे आढळल्यास त्याचे छायाचित्र काढण्यात यावे.

६) पोलीस कोठडीत आरोपीचा मृत्यु झाल्यास त्याचे शवविच्छेदन करतांना चलचित्रण करून त्याचे जतन करावे.

७) एखाद्या आरोपीस मारहाण झाल्यामुळे त्याचा पोलीस कोठडीत मृत्यु झाल्यास तसेच आरोपीस प्राणघातक ईजा झाल्याचे आढळल्यास संबंधीताविरूध्द भारतीय दंड संहितेनुसार नमुद गुन्ह्यासाठी एफ.आय.आर. दाखल करण्यात यावा. अशा प्रकरणांमध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७६ (१-अ) च्या तरतुदीनुसार त्याबाबत दंडाधिकारीय चौकशी करण्यात यावी तसेच त्याबाबतचे पुरावे नष्ट होणार नाहीत याची खात्री करावी.

८) अशा प्रकरणी विशेष सरकारी वकीलाची व त्याच्या मदतीसाठी महिला सरकारी वकीलाची नियुक्ती करण्यात यावी.

◆ माननीय सर्वोच्च न्यायालयाने डी. के बसु विरूध्द पश्चिम बंगाल राज्य या प्रकरणात पोलीसांनी अटक करताना अनुसरण करण्यासाठी विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे घालून दिलेली आहेत. ती खालील प्रमाणे:

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

१) आरोपीला अटक करणाऱ्या आणि त्याची चौकशी करणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्याने त्याचे पद व नाव याची स्पष्ट व अचूक ओळख दर्शविणारा बिल्ला (tag) परिधान करावा. अटक केलेल्या आरोपीची चौकशी करणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्याचा तपशीलाची नोंद एका नोंदवहीत करून ठेवणे आवश्यक आहे
२) अटक करणारा पोलीस अधिकारी/कर्मचारी, अटक करतांना अशा अटकेचा मेमो (memo) तयार करेल ज्यावर किमान एका साक्षिदाराची स्वाक्षरी असेल जो अटक केलेल्या व्यक्तीच्या  कुटुंबातील सदस्य किंवा अटक करण्यात आलेल्या परिसरातील एक आदरणीय व्यक्ती असेल. सदर मेमोवर अटक केलेल्या व्यक्तीची प्रतीस्वाक्षरी आणि अटकेचा दिनांक आणि वेळ नमुद असेल.
३) अशा मेमोवर साक्षीदार म्हणून स्वाक्षरी करणारी व्यक्ती, अटक केलेल्या व्यक्तीची मित्र किंवा नातेवाईक नसेल, अटक केलेल्या किंवा ताब्यात घेतलेल्या व्यक्तीस ठेवण्यात आले असेल ते स्थान, पोलीस ठाणे किंवा तपास कक्ष किंवा लॉक-अप यापैकी जे असेल ते, अटक केलेल्या व्यक्तीचा मित्र किंवा नातेवाईक किंवा त्या व्यक्तीची काळजी असणाऱ्या व्यक्तीला लवकरात लवकर कळविण्याचा त्याला हक्क असेल.
४) अटक केलेल्या व्यक्तीचे मित्र किंवा नातेवाईक त्या शहराच्या किंवा जिल्हयाच्या बाहेर राहत असतील तर, अटक केल्यानंतर ८ ते १२ तासाच्या आत, त्यांना त्या शहर/जिल्हयातील जिल्हा कायदेशीर मदत संघटनेच्या माध्यमातून,  संबंधित पोलीस ठाण्यामार्फत किंवा तारेच्या माध्यमातुन संबंधित अटकेबाबत, अटकेची वेळ व अटक केलेल्या व्यक्तीला ठेवलेले स्थळ सूचित करणे आवश्यक आहे.
५) अटक केलेल्या किंवा ताब्यात घेतलेल्या व्यक्तीला, सदर अटकेबाबत त्याला त्याच्या नातेवाईकांना कळविण्याचा हक्क आहे याची तात्काळ जाणीव करून द्यावी.
६) अशा अटकेसंबंधी, अटक केलेल्या जागेवरील नोंदवहीमध्ये सदर अटकेची तसेच अटक केलेल्या व्यक्तीच्या ज्या मित्राला/नातेवाईकाला त्याबाबत कळवायचे आहे याची आणि ज्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्याच्या ताब्यात अशी अटक झालेली व्यक्ती आहे याबाबत तपशील नोंदवावा.
७) अटक केलेल्या व्यक्तीच्या शरीरावर, अटक करतांना असलेल्या लहान-मोठ्या जखमांची नोंद घेण्यात यावी. आणि अशा 'तपासणी मेमो' वर अटक झालेल्या व्यक्तीची आणि अटक करणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्याने स्वाक्षरी करून त्याची एक प्रत  अटक झालेल्या व्यक्तीला देण्यात यावी.
८) अटक केलेली व्यक्ती, त्याच्या अटकेच्या दरम्यान दर ४८ तासाला, संबंधीत राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या संचालक, आरोग्य सेवा यांनी मंजूर व नियुक्त केलेल्या डॉक्टरांच्या पॅनेलवरील  डॉक्टरने तपासण्यास पात्र असेल. संचालक, आरोग्य सेवा हे असे एक पॅनेल प्रत्येक तालुका आणि जिल्हा स्तरावर तयार करतील.
९) वर नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची प्रत, अटक मेमोसह न्याधिशांना अभिलेखकामी सादर करण्यात येईल.
१०) अटक केलेल्या व्यक्तीला, तपासादरम्यान, त्याच्या वकीलाला भेटता येईल.
११) अटक करणारा अधिकारी, पोलीस नियंत्रण कक्षामार्फत सर्व  जिल्हा आणि राज्य मुख्यालयात, अटके संदर्भात आणि अटक करून ठेवलेल्या ठिकाणाच्या संदर्भात माहिती १२ तासात कळवेल. आणि पोलीस नियंत्रण कक्ष ही माहिती नोटीस बोर्डवर प्रदर्शित करेल.
उपरोक्त सुचनांचे पालन न करणारे पोलीस अधिकारी/कर्मचारी खातेनिहाय कारवाईला पात्र असतील तसेच त्याच्या विरूध्द न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल प्रादेशिक कार्यकक्षा असलेल्या कोणत्याही उच्च न्यायालयात खटला दाखल करता येईल.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, कलम १७६ अन्वये मृत्युच्या कारणांची दंडाधिकारीय चौकशी करण्याची तरतुद आहे. ती खालील प्रमाणे:

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

१७६. (१) जेव्हा एखादी व्यक्ती पोलिसांच्या हवालातीत असताना मृत्यू पावली असेल किंवा ते प्रकरण कलम १७४-पोटकलम (३) चा खंड (एक) किंवा खंड (दोन) यांमध्ये निर्देशिलेल्या स्वरुपाचे असेल तेव्हा, मरणान्वेषण करण्याची शक्ती प्रदान झालेल्या सर्वांत जवळच्या दंडाधिकाऱ्याला कलम १७४ च्या पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अन्य कोणत्याही प्रकरणी, याप्रमाणे शक्ती प्रदान झालेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याला पोलीस अधिकाऱ्याने करावयाच्या अन्वेषणाच्या ऐवजी किंवा त्याशिवाय आणखी, मृत्यूच्या कारणाबाबत चौकशी करता येईल; व जर त्याने तसे केले तर, त्याला एखाद्या अपराधाची रीतसर चौकशी करताना ज्या शक्ती राहिल्या त्या सर्व शक्ती ती चौकशी चालवताना राहतील.

(२) अशी चौकशी चालवणारा दंडाधिकारी त्यासंबंधात त्याने घेतलेला साक्षीपुरावा प्रकरणाच्या परिस्थितीप्रमाणे यात यापुढे विहित केलेल्या कोणत्याही रीतीने नोंदून घेईल.

(३) जिला आधीच पुरण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूचे कारण शोधून काढण्यासाठी तिच्या मृतदेहाची तपासणी करणे हे जेव्हा केव्हा अशा दंडाधिकाऱ्याला समयोचित वाटेल तेव्हा, दंडाधिकारी तो मृतदेह उकरावयास लावील व त्याची तपासणी करवील.

(४) जेव्हा या कलमाखाली चौकशी करावयाची असेल तेव्हा, दंडाधिकारी, व्यवहार्य असेल तेव्हा, मृताच्या ज्या नातलगांची नावे व पत्ते माहीत असतील त्यांना तसे कळवील व त्यांना चौकशीच्या वेळी उपस्थित राहण्याची मुभा देईल.

स्पष्टीकरण.—या कलमात, "नातलग" या शब्दप्रयोगाचा अर्थ, आईबाप, अपत्ये, भाऊ, बहिणी व पति वा पत्नी, असा आहे.

DETKAR, D

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, कलम १७४ अन्वये मृत्युच्या कारणांची दंडाधिकारीय चौकशी करण्याची तरतुद आहे. ती खालील प्रमाणे:

१७४. (१) एखाद्या व्यक्तीने आत्महत्या केलेली आहे अथवा दुसऱ्याकडून किंवा एखाद्या जनावराकडून किंवा यंत्राद्वारे किंवा अपघाताने तिची हत्या घडून आलेली आहे अथवा अशा परिस्थितीत ती मृत्यू पावली आहे की, अन्य एखाद्या व्यक्तीने अपराध केलेला असावा असा वाजवी संशय निर्माण होतो अशी जेव्हा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला किंवा राज्य शासनाने त्यासंबंधात खास शक्ती प्रदान केलेल्या अन्य एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला खबर मिळेल तेव्हा, मरणान्वेषण करण्याची शक्ती प्रदान झालेल्या सर्वांत जवळच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याला तो तात्काळ त्याची सूचना देईल आणि राज्य शासनाने विहित केलेल्या कोणत्याही नियमाद्वारे अथवा जिल्हा किंवा उप-विभागीय दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अन्यथा निदेशित करण्यात आले नसेल तर, जेथे अशा मृत व्यक्तीचा देह असेल त्या जागी तो जाईल व तेथे जवळपासच्या दोन किंवा अधिक प्रतिष्ठित रहिवाश्यांच्या समक्ष अन्वेषण करील व त्या मृतदेहावर जेथे कोठे जखमा झाल्याचे, हाड मोडल्याचे, अंग खरचटल्याचे आणि दुखापतीच्या इतर खुणा असल्याचे आढळून येईल त्याचे वर्णन व कशा प्रकारे किंवा कोणत्या हत्यारामुळे किंवा साधनामुळे (वापरले असल्यास) अशा खुणा झाल्या असल्याचे दिसते ते नमूद करून मृत्यूच्या दर्शनी कारणांचा अहवाल तयार करील.

(२) पोलीस अधिकारी व अन्य व्यक्ती यांना किंवा त्यांच्यापैकी जितक्या व्यक्ती त्या अहवालाशी सहमत असतील तितक्या व्यक्तींना त्यावर स्वाक्षरी करावी लागेल व तो तात्काळ जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे किंवा उप-विभागीय दंडाधिकाऱ्याकडे पाठवला जाईल.

(३) जेव्हा—

(एक) ते प्रकरण एखाद्या स्त्रीने तिचा विवाह झाल्यापासून सात वर्षांच्या आत आत्महत्या केल्यासंबंधीचे असेल तेव्हा; किंवा

(दोन) ते प्रकरण एखाद्या स्त्रीचा विवाह झाल्यापासून सात वर्षांच्या आत अशा कोणत्याही परिस्थितीत तिचा मृत्यू घडण्यासंबंधीचे असेल की, ज्या परिस्थितीत अशा स्त्रीच्या संबंधात दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने अपराध केलेला असावा असा वाजवी संशय निर्माण होऊ शकतो तेव्हा; किंवा

(तीन) ते प्रकरण एखाद्या स्त्रीचा विवाह झाल्यापासून सात वर्षांच्या आत तिचा मृत्यू घडण्यासंबंधीचे असेल आणि त्या स्त्रीच्या कोणत्याही नातलगाने विनंती केली असेल तेव्हा; किंवा

(चार) मृत्यूच्या कारणांविषयी कोणताही संशय असेल तेव्हा; किंवा

(पाच) इतर कोणत्याही कारणासाठी पोलीस अधिकाऱ्याला तसे करणे समयोचित वाटेल तेव्हा

राज्य शासन यासंबंधात विहित करील अशा नियमांच्या अधीनतेने, तो पोलीस अधिकारी त्या मृतदेहाची तपासणी केली जावी या हेतूने सर्वात जवळच्या जिल्हा शल्यचिकित्सकाकडे किंवा राज्य शासनाने यासंबंधात नियुक्त केलेल्या अन्य अर्हताप्राप्त वैद्यकीय तज्ञाकडे तो मृतदेह पाठवील— मात्र जेणेकरून अशी तपासणी निरुपयोगी होईल इतपत तो मृतदेह बाटेल कुजेल असा धोका न पत्करता तो याप्रमाणे पाठवणे शक्य व्हावे अशा प्रकारे हवामानाची स्थिती व अंतर अनुकूल असावे.

(४) मरणान्वेषण करण्यास पुढील दंडाधिकाऱ्यांना शक्ती प्रदान करण्यात आली आहे. ते असे:— कोणताही जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी व राज्य शासनाने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने यासंबंधात खास शक्ती प्रदान केलेला अन्य कोणताही कार्यकारी दंडाधिकारी.

पोलीस कोठडीतील आरोपीचा मृत्यू झाल्यास त्याबाबत पोलीस अधिक्षक / कारागृह अधिक्षक यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मानवी हक्क आयोगास तातडीने बिनतारी संदेशाद्वारे कळविले जाते.
घटना घडलेल्या ठिकाणाचे संबंधीत उपविभागीय दंडाधिकारी यांना सदर मृत्युच्या कारणांची दंडाधिकारी चौकशी करून अहवाल सादर करणे विषयी आदेश दिले जातात.

पोलीस कोठडीतील आरोपीच्या मृत्युबाबत चौकशी करण्याचे आदेश प्राप्त झाल्यानंतर दंडाधिकारी यांनी खालील कागदपत्रे प्राप्त झाल्याची खात्री करावी.

- संबंधीत पोलीस स्टेशनचा अहवाल
- मानवी हक्क आयोगास बिनतारी संदेशाद्वारे कळविले गेल्याचा पुरावा.
- पोस्ट मार्टम रिपोर्ट व त्याचे चलचित्रणाची प्रत.
- मृत्युचा दाखला
- एफ.आय.आर. ची प्रत
- अकस्मात मृत्यूच्या खबरीची प्रत
- इन्क्वेस्ट पंचनाम्याची प्रत
- कोठडीत मृत्यू पावलेल्या व्यक्तीची कोठडीत रवानगी करण्यापूवी वैद्यकीय तपासणी करण्यात आली असल्यास तपासणी अहवालाची प्रत
- मयत इसमास मृत्युपूर्वी पोलीस किंवा न्यायालयीन कोठडी मंजुर झाली असल्यास संबंधित रिमांड अर्जाची प्रत
- कोठडीत मृत्यु होण्यापूर्वी संबंधित व्यक्तीस कोठडीसाठी न्यायालयात हजर केल्यानंतर त्याने जर मारहाणीची तक्रार व त्यावरुन त्या व्यक्तीची वैद्यकिय तपासणी केली गेली असल्यास त्या तपासणी अहवालाची प्रत.

◆**चौकशी:** उपरोक्त सर्व कागदपत्रांचा सखोल अभ्यास करावा.
पोलीस कोठडीत मृत्यू पावलेल्या व्यक्तीप्रकरणात विनाविलंब चौकशी करावी. आरोपी मयत झाल्याच्या घटना स्थळाला भेट द्यावी. मयताचे नातेवाईक, मित्र, सदर प्रकरणाशी संबंधित सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांचेकडे चौकशी करून त्यांचे जबाब घ्यावे. मयतासह पोलीस/न्यायलयीन कोठडीत असलेल्या व्यक्तींना विश्वासात घेऊन त्यांच्याकडे चौकशी करून त्यांचे जबाब घ्यावे.
इन्क्वेस्ट पंचनाम्यामध्ये काही जखमा दिसून आल्या असतील तर त्याबाबत खात्री करावी. इन्क्वेस्ट पंचनामा करणाऱ्या अधिकाऱ्यास समक्ष बोलवून चौकशी करावी. पोस्ट मार्टम करणाऱ्या डॉक्टरची समक्ष भेट घेऊन चर्चा करावी. मयत आरोपीचे नातेवाईक, मित्र नेहमीच अशा मृत्युबाबत संशय व्यक्त करतात. त्यामुळे अत्यंत निपक्षपातीपणे आणि सद्सदविवेकबुद्धिने त्यांच्याकडे चौकशी करावी. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासी अधिकाऱ्यांशी चर्चा करावी.
चौकशी दरम्यान-

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collec

• मृत्युच्या वेळेची परिस्थिती
• मृत्युशी निगडीत प्रसंग व अनुक्रम
• मयताला असणारे रोग, व्यसने
• मृत्युचे कारण
• मयताला दिलेल्या वैद्यकीय उपचारांचा काळ, तातडी
• मृत्युस कारणीभूत घटक
यांबाबत विशेष लक्ष द्यावे.

वरील सर्व बाबी आणि कागदपत्रांचा सखोल अभ्यास करून त्याबाबतचा परिपूर्ण आणि स्वयंस्पष्ट अहवाल मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना सादर करावा.
चौकशी करतांना ती निपक्षपातीपणे करावी. तुमच्या अहवालावर बरेच महत्वाचे आणि मोठे निर्णय घेतले जाणार आहेत याची जाणीव ठेवावी.
तुमच्या अहवालाच्या आधारे मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी त्यांचा अहवाल अहवाल मानवी हक्क आयोगास सादर करतात.

◆ वरील चौकशी करतांना बऱ्याच वैद्यकीय संज्ञा वाचायला आणि ऐकायला मिळतात. त्यांचा अर्थ निट समजून घेणे आवश्यक असते. त्याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करणे आवश्यक असते. काही वैद्यकीय संज्ञांचे अर्थ संदर्भासाठी खाली नमुद केले आहेत.

• Abrasion – ओरखडा
• Acute dilation of stomach – वाजवीपेक्षा जास्त जेवण झाल्यामुळे जठरावर ताण पडून आलेला मृत्यु
• Adipocere – पाण्यात किंवा थंड हवेच्या ठिकाणी प्रेत कुजण्याऐवजी, त्यामध्ये तयार होणारा मेणासारखा पदार्थ
• Antemortem – मृत्युपूर्वी झालेली
• Asphyxia - ॲस्फिक्शिया - श्वसनावरोध - प्राणवायु फुफ्फुसात जाण्याचे बंद झाल्यामुळे आलेला मृत्यु
• Bed sores – सतत झोपून राहिल्याने होणारे कमरेखालील व्रण
• Bestiality- पशुसंभोग
• Blisters – फोड
• Blunt – बोथट
• Bruises and contusion - खरचटलेले आणि मुका मार
• Burns- seared – जळणे- पोळणे
• Chronic – जुनाट
• Collapse – शक्तीपात
• Colon – आतडे
• Coma - कोमा- मज्जाघात - मेंदूचे कार्य स्थगित होऊन कायमच्या बेशुद्धीने आलेला मृत्यू
• Concussion - मेंदूला झालेली इजा
• Congestion – रक्तसंचय
• Contused wound – सूज आलेली जखम (दगड, लोखंडी पहार, काठी यामुळे झालेली)
• Cranium/Skull – कवटी

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy Collector

• Cyanosed- रक्तातील प्राणवायूचे प्रमाण अपुरे पडल्यामुळे त्वचेवर व श्लेश्मल त्वचेवर येणारा निळसरपणा
• Decomposition – कुजणे, सडणे
• Dislocation - निखळणे
• Drowning - पाण्यात किंवा द्रव पदार्थात बुडून
• Epiglottis – घशातील वायुनलिकेवरील झडप
• Fangs - विषारी दात
• Food poisoning – अन्नामुळे विषबाधा
• Gunshot Wound – स्फोटक शस्त्राने झालेली जखम
• Hanging – टांगून घेणे- फाशी घेणे
• Heat stroke – उष्माघात
•Hymen – योनिमुखावरील पातळ पडदा
• Hypodermic – त्वचेखालून
• Incised wound- धारदार शस्त्राने झालेली जखम
• Incised wounds – कापीव जखम (तीक्ष्ण चाकु, ब्लेड, कुऱ्हाडीचे पाते अशा शस्त्राने झालेली)
• Injuries to Muscles and bones – स्नायु आणि हाडांच्या जखमा
• Intestine – आतडे
• Intramuscular – स्नायूमधून
• Intrathecal - मज्जारज्जूतून
• Intravenous – शिरेतून
• Lacerated wound – ठेचाळलेली/बोथट शस्त्राने जखम (दगड, विट याने किंवा यंत्रात सापडल्यामुळे झालेली)
• Larynx – स्वरयंत्र
• Liver – यकृत
• Mummification – उष्ण हवेच्या ठिकाणी प्रेत कुजण्याऐवजी, मृत शरीरातील पेशीसमूह सुकून गेल्यामुळे प्रेत सुकण्याची क्रिया
• Necrophilia – प्रेतावर बलात्कार
• Other Organs - इतर इंद्रिये
• Postmortem – मृत्युनंतर झालेली
• Punctured wound – भोसकलेली जखम (भाला, सूरी, संगिन, बाण अशा शस्त्राने झालेली)
• Pupil – डोळ्याची बाहुली
• Rigor Mortis - मृत्यूनंतर घडून येणारा स्नायूंचा ताठरपणा (साधारण हवेत तीन तासात सुरू होतो, ऊन्हाळ्यात लवकर सुरू होतो)
• Scars – व्रण
• Semen – विर्य
• Seminal stains – विर्याचे डाग
• Shock – भयाघात

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

- Sodomy – गुदामैथुन
- Sperm – शुक्राणु
- Spine - पाठीचा कणा
- Spleen – प्लिहा
- Starvation – उपासमार
- Sternum bone – छातीतील हाड
- Still born – जन्मत: मेलेले मूल
- Strangulation- गळा दाबल्यामुळे
- Suffocation – गुदमरल्यामुळे
- Syncope- सिंकोपी – हृदयावरोध – हृदयक्रिया बंद पडून आलेला मृत्यू
- Tardieu's spots – श्वसनावरोधामुळे रक्ताचा दाब वाढतो आणि या दाबाचा परिणाम म्हणून केशवाहिन्या फाटल्यामुळे दिसणारे रक्ताचे चट्टे
- Throttling – गळा दाबून मारणे
- Tissue – पेशी
- Trachea - श्वास नलिका
- Ulcer - व्रण
- Vaginal Injuries – योनीच्या जखमा
- Womb – गर्भाशय

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector